**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २५ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ विधीमंडळात एकमतानं मंजूर.**
2. **विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा शासनाचा निर्णय.**
3. **शहरात इंधनाचा साठा पुरेसा, पॅनिक बाईंग न करण्याचं जिल्हाधिकारी डॉ.विपीन यांचं आवाहन.**
4. **हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील कुपोषणाच्या समस्येत वाढ- मातेच्या पोषणाला प्राधान्यक्रम देण्याचे युनिसेफचे आवाहन.**
5. **नागपूरात दिनांक 27 ते 29 मार्च दरम्यान चित्रपट महोत्सवाचं आयोजन.**

**विधी मंडळ**

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर झालं. ॲसिड हल्ल्यातील पीडितेचं नाव उघड करू नये तसंच डिजिटल माध्यमांवर महिलेची बदनामी केली तर तो विनयभंग समजला जाईल अशा तरतुदी या विधेयकात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक विधानपरिषदेत मांडलं आणि यातल्या तरतुदींची माहिती दिली. अशा प्रकारचे विशेष कायदे आणि तरतुदींच्या दुरुपयोगासंदर्भातल्या घटनांचं विश्लेषण करणं, त्यानुसार नियम किंवा कायद्यांमध्ये बदल करणं किंवा संरक्षण देण्याबाबत शिफारशी करण्यासाठी पोलीस महानिरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. या समितीत एका वरिष्ठ महिला अधिकाऱ्याचाही समावेश असेल. विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. नाना पटोले, किशोर जोरगेवर यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात छत्तीसगड राज्यातून हत्तीचा कळप आला असून यामुळे शेतपिकाचं मोठं नुकसान झाल्याचं नाना पटोले यांनी उपस्थित केला. या कळपाला छत्तीसगडकडे जाण्यासाठी मार्ग खुला करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली. यावर कारवाई केली जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं.

**गॅसच्या नोंदणी नियमांमध्ये बदल**

घरगुती वापराच्या स्वयंपाकाच्या गॅसच्या नोंदणी नियमांमध्ये बदल झाल्याच्या बातम्या चुकीच्या असल्याचं सरकारने स्पष्ट केलं आहे. शहरी भागात २५ दिवसांच्या अंतराने आणि ग्रामीण भागात ४५ दिवसांच्या अंतराने गॅस सिलिंडरची नोंदणी करता येणार आहे. नोंदणीचा हा कालावधी वाढवला असल्याच्या बातम्या प्रसारित झाल्यानंतर सरकारकडून हे स्पष्टीकरण देण्यात आलं. देशात एलपीजीचा पुरेसा साठा असून, पुरवठा सुरळीत सुरु आहे. त्यामुळे नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, आणि अनावश्यक पॅनिक बुकिंग टाळावी, असं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान, पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याच्या अफवा देखील पूर्णपणे निराधार असल्याचं भारतीय तेल महामंडळानं स्पष्ट केलं आहे. देशात इंधनाचा पुरेसा साठा असून, पुरवठा साखळी सामान्यपणे सुरू आहे. नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये आणि पुढील माहितीसाठी केवळ अधिकृत स्रोतांवरच अवलंबून

रहावं, असं आवाहन महामंडळाने केलं आहे. नागपुर जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा आहे. तरीही  देखील पेट्रोलपंप वर लोक गर्दी करत असल्यामुळे लोकांनी पॅनिक बायिंग करू नये असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ.विपीन यांनी केलं आहे-नागपूर जिल्हाधिकारी-

**बर्ड फ्लू**

नागपूर इथल्या सेमिनरी हिल्स परिसरातील, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रातील कुक्कुट पक्ष्यांमध्ये, एच-5एन-1 एव्हीयन इन्फ्लूएंझा अर्थात बर्ड फ्लू विषाणू आढळल्यान प्रशासन सतर्क झाल आहे. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी 1 किलोमीटर  परिसर बाधित क्षेत्र तर त्या पुढील 9 किलोमीटर  परिसर निगराणी क्षेत्र म्हणून घोषित केला आहे-

बाधित क्षेत्रातील कुक्कुट पक्षी, अंडी आणि खाद्याची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यात आले असून पुढील 21 दिवस खरेदी-विक्री, वाहतूक आणि बाजारांवर बंदी घालण्यात आली आहे. निगराणी क्षेत्रातील कुक्कुट विक्री दुकानेही बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**युनिसेफ**

हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील कुपोषणाच्या समस्येत वाढ होत आहे. हवामान बदलामुळे अन्नधान्याच्या किंमतीवर परिणाम होतो, दुष्काळामुळे  कृषी क्षेत्रावर संकट कोसळते याचा परिणाम  गर्भवती मातांच्या पोषणावर दिसून येतो. राज्यात कुपोषणाची परिस्थिती सुधारत असली तरी आदिवासी भागांतील गर्भवती महिला, शहरांतील गरीब आणि कामगार वस्त्या, इथं कुपोषणाचं प्रमाण अधिक आढळून येतं, असं प्रतिपादन युनिसेफ अर्थात  संयुक्त राष्ट्र बालनिधी या आांतरराष्ट्रीय संघटनेचे महाराष्ट्र विभागप्रमुख संजय सिंग यांनी केलं. युनिसेफर्फे आज प्रसारमाध्यमांसाठीनागपुरातील आयएमए सभागृहात  पोषण प्राधान्य आणि प्रारंभिक  बालविकास यावर आधारित कार्यशाळेच आयोजन करण्यात आल होत, त्यावेळी ते बोलत होते. जीवनशैली, वातावरण बदल तसेच आहार विविधता हे घटक बालसंगोपन आणि कुपोषण यांना प्रभावित करतात. स्वस्थ भारत निर्मितीसाठी मातेच्या पोषणाला प्राधान्यक्रम देणं आवश्यक आहे. प्रसार माध्यमं  यासंदर्भात जनजागृती आणि लोकमत तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे असं ते म्हणाले. याप्रसंगी पत्र सूचना कार्यालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी आपल्या भाषणात पत्र सूचना कार्यालयाच्या संकेतस्थळवर विविध आरोग्यविषयक माहितीपर लेख सर्व भाषांत उपलब्ध असून हे प्रसारमाध्यमांना एक साधन म्हणून उपयोगी पडत असल्याचं सांगितलं.

**नागपूर फिल्म फेस्टिव्हल**

नागपूरात  दिनांक 27, 28 आणि 29 मार्च दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज कॅम्पसमध्ये चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवाचं हे दुसरं वर्ष आहे. या महोत्सवात देशभरातून प्राप्त 304 चित्रपटांपैकी 189 लघु चित्रपट दाखवले जाणार असून 6 मास्टरक्लास, 2 पॅनल चर्चा आणि AI फिल्म मेकिंग कार्यशाळेच आयोजन करण्यात आल आहे. 28 मार्च रोजी अभिनेता रणदीप हुड्डा यांच्या हस्ते महोत्सवाचं उद्गाटन होणार असून समारोपाला दिग्दर्शक ओम राऊत उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात “युवा आणि सिनेमा” या विषयावर विशेष सत्र, तसेच 3 सांस्कृतिक

कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.यंदा प्रथमच AI आधारित चित्रपटांची श्रेणी समाविष्ट करण्यात आली असून त्यात 21 भाषांमधील चित्रपट प्राप्त झाले आहेत. हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला असून प्रेक्षकांनी ऑनलाईन नोंदणी करून उपस्थित राहावे, असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**आंबेडकरी विचार संगीती**

संबोधी: डॉ. आंबेडकर स्टडी सर्कलच्या वतीने दिनांक 28 आणि 29 मार्च रोजी दोन दिवसीय “आंबेडकरी विचार संगीती”चं आयोजन करण्यात आल आहे. डॉ .बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन ,भीम टेकडी अमरावती इथं होणाऱ्या संगीतीच्या पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत ताराचंद्र खांडेकर राहणार असून उद्घाटन सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. महेंद्र भवरे यांच्या हस्ते होणार आहे.कार्यक्रमात विविध विषयांवर परिसंवाद, ‘आंबेडकरी गझल जागर’ मुशायरा, तसच 29 मार्च रोजी कवी गोविंद वाघमारे यांच्या अध्यक्षतेत कविसंमेलनही आयोजित करण्यात आल आहे.

**हवामान**

हवामान- आज नागपुरात अधून मधून ढगाळ वातावरण असल्याने उकाडा वाढला आहे. मागील २४ तासांत विदर्भात अमरावती आणि वर्धा इथं सर्वाधिक 40 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. त्या पाठोपाठ अकोला इथं 39.6, वाशीम मध्ये 38.4 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात उद्या वादळी पर्जन्यमानासह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. परवा देखील याच जिल्ह्यांसह नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात सुद्धा मेघगर्जना आणि वादळी पर्जन्यमान राहू शकत असा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे.

**दूरदर्शन मालिका**

दूरदर्शन नागपूर द्वारे निर्मित नवी मालिका" भारतीय संविधानाचे विविध आयाम" सह्याद्री वाहिनीवरून 24 मार्च पासून प्रसारित केला जात आहे. दर मंगळवार ,गुरुवार, शनिवार आणि रविवारी सायंकाळी 4 वाजता प्रसारित होणाऱ्या या मालिकेद्वारे संविधानाचे तत्त्वज्ञान ,वैशिष्ट्य आणि महत्त्वाची ओळख करून देण्यात येणार आहे. या 13 भागांच्या मालिकेची संकल्पना आणि कार्यकारी निर्माता रचना पोपटकर -गजभिये आणि निर्माता मनोज जैन आहेत.

*****